रयत शिक्षण संस्थेचे

सदगुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड

**उद्योजकता विकास केंद्र**

**Industrial Summit**

**अहवाल**

दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी सदगुरु गाडगे महाराज कॉलेज मध्ये कार्यरत असणाऱ्या उद्योजकता विकास केंद्रा मार्फत एक दिवसीय इंडस्ट्रियल समिट आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून कर सल्लागार, मा.विकास पाटील, हे उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य मा.डॉ.मोहन राजमाने हे होते.

विकास पाटील यांनी उद्योगाची ए.बी.सी.डी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या समिटसाठी वेगवेगळ्या औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक उपस्थित होते. त्यामध्ये मा. पराग वडके, सौ. सुमय्या सुतार, सी.ए. तन्मय पाटील व मा.अमित बुधकर यांनी विद्यार्थ्यांना उद्योजकतेबद्दल मार्गदर्शन केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणाले की, विद्यार्थ्यांनी नोकरी व्यतिरिक्त स्वतःचा उद्योगधंदा चालू करावा व अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. या इंडस्ट्रियल समिट मध्ये महाविद्यालयातील ४०० हुन अधिक विध्यार्थी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. ए. पाटील, प्रा. नेताजी सूर्यवंशी, प्रा. माधुरी कांबळे, रुसा समन्वयक प्रा. डॉ.यु.बी मोरे तसेच रजिस्ट्रार आर. वाय. गायकवाड व इतर मान्यवर उपस्थित होते. उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक प्रा. डॉ. सतीश पार्टे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक व पाहुण्यांचे स्वागत केले तर प्रा. डॉ. कोमल कुंदप यांनी सूत्रसंचालन केले व प्रा. डॉ. सचिन यादव यांनी आभार मानले.

| | |
|---|---|
| समन्वयक | प्राचार्य |
| उद्योजकता विकास केंद्र | स.गा.म कॉलेज, कराड |




SGM


SGM




SGM


सद्गुरु गाडगे महाराज कॉलेज, कराड
SGM


SGM





SGM